## <u>फाईट बॅक:</u> भिंत कि देवालय?

एका सकाळी एक व्यक्ती एका रस्त्यावरुन चालत निघाली होती. आज त्याच्याकडे नेहमीपेक्षा जास्त वेळ असल्यामुळे इकडे तिकडे बघत, निरीक्षण करत त्याचे चालणे सुरु होते. तेव्हा त्याला एक मजूर दगडावर काही काम करताना दिसला. तसा सहज तो मजुरापाशी गेला आणि त्याने मजुराला विचारले 'तू हे काय काम करतो आहेस?' 'हे दगड घडवायचे आहेत म्हणून मी ते तासत आहे.' मजूर उत्तरला. 'ठीक आहे' म्हणत ती व्यक्ती पुढे चालू लागली. थोड्याच अंतरावर त्याला आणखी एक कामगार पुन्हा दगडावरच काम करताना दिसला. अर्थात आधीच्या माणसाच्या उत्तराने तो पूर्णपणे समाधानी नव्हता म्हणून त्याने परत त्या दुसऱ्या कामगाराला विचारले 'हे दगडाच काय करत आहात तुम्ही?' तर कामगार म्हटला 'इथे आम्ही तीस फूट उंच आणि साठ फूट लांब अशी भिंत बांधत आहोत. त्याच्यासाठीच आम्ही दगड कापत आहोत' असे बोलून तो पटकन दगड उचलून पुन्हा कामाला लागला. नंतर ती व्यक्ती तशीच पुढे चालत राहिली. आता त्याला आणखी एक मजूर भेटला. तिसऱ्या मजुराला व्यक्तीने विचारले की 'हे तुम्ही सगळेजण हे काय करत आहात. एक दगड फोडत आहे, एक भिंत बांधत आहे, आणि आता तुम्ही?' तिसरा मजूर स्पष्टीकरण देत व्यक्तीला म्हणाला 'इथे आम्ही केवळ दगड फोडत आहोत किंवा भिंत बांधत आहोत असे नाही तर इथे आम्ही विठ्ठलाचे मोठे मंदिर बांधत आहोत. आषाढी एकादशीच्या आत मंदिर पूर्ण करुन एकादशीलाच आम्ही त्याचे सुंदर उद्घाटन करणार आहोत. माझ्या डोळ्यासमोर आत्ताच एक चित्र आहे की विठू माऊलीच्या प्रसन्न मूर्ती समोर मी भक्तिभावाने हात जोडून उभा आहे. आणि म्हणूनच आम्ही ही मेहनत घेत आहोत.'

या गोष्टींमध्ये तुम्हाला एक मजेशीर बाब लक्षात आली असेल कि पहिला मजूर होता त्याच्या दृष्टीने तो दगड फोडत होता, दुसऱ्या मजुराच्या दृष्टीने तो एक भिंत बांधत होता, पण तिसऱ्याच्या दृष्टीने मात्र ते त्याचे एक स्वप्न होते. त्याच्या मनातले एक चित्र होते. त्याच्या दृष्टीने ते स्वप्न, ते चित्र एक सक्सेस होती. व्यवसायामध्ये सुद्धा काम करत असताना असेच स्वप्न असायला हवे, चित्ती चित्र रंगवायला हवे.

खरेतर व्यवसाय हा व्यवसायिकाच्या आयुष्याचा एक अमुलाग्र भाग असतो. खरा व्यवसायिक आयुष्यामधला जवळपास एक तृतीयांश (३३%) वेळ व्यवसायामध्ये घालवत असतो. आणि त्यामुळे जीवनात यशस्वी होण्यासाठी व्यवसायामध्ये पण सक्सेसफुल व्हावे लागते. व्यवसायामध्ये स्वप्ने पूर्ण करावी लागतात. विनिंग असावे लागते.

तर या विनिंगचा अर्थ काय? चीनमधील प्राचीन लष्करी रणनीतिकार सन त्झू यांनी विनिंगची खूप वेगळी, अनोखी संज्ञा दिली आहे. ते म्हणतात 'Winning means developing the position that people would rather join than attack' 'जिंकणे म्हणजे अशी परिस्थिती निर्माण करणे कि हल्ला करण्याऐवजी लोक तुमच्या सोबत सामील होतील (तुमच्या कामामध्ये सहभागी होतील).' एकंदरीतच काय तर आपली स्वप्ने जर सक्सेसफुल करायची असतील तर आपल्याला लोकांना बरोबर घ्यायला हवे. वेगवेगळ्या बिझनेस युनिट्सना सोबत ठेवायला हवे. तर आणि तरच आपण आपली स्वप्ने सक्सेसफुली साकार करु शकतो.

अच्छा, मोठा व्यवसाय करत असले तरी मोठाच्या मोठा बिझनेस उभा करणे हेच काही प्रत्येक व्यावसायिकाचे स्वप्न असेल असे नाही. तर स्वप्ने इतरही असू शकतात. एक चांगले ज्वेलर माझ्या परिचयाचे आहेत. खूप ठिकाणी त्यांच्या ब्रँचेस आहेत. पण त्यांना जुन्या-पुरातन-ऐतिहासिक वस्तू गोळा करण्याचा, जतन करण्याचा छंद आहे. स्वप्न आहे. तर ते सतत ते स्वप्न जगत असतात, त्यासाठी काम करत असतात. आणखी एक माहितीतले ज्वेलर आहेत. त्यांचे चांगले शोरुम आहे. परंतु शोरुमच्या धामधुमीतून वेळ काढून ते जवळपासच्या सर्व मॅरेथॉनमधून धावायला जातात. मॅरेथॉन कमीत कमी वेळात पूर्ण करणे हे त्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी ते दररोज नेमाने सराव देखील करत असतात. म्हणजेच काय तर जीवनाच्या अशा विनिंगमधून, बिजनेसमधल्या विनिंगमधून, आपल्या स्वप्नांमधून, आपल्याला जीवनाचा अर्थ मिळत असतो. एक प्रकारची पूर्ततेची भावना

आपल्यामध्ये निर्माण होत असते. थोडक्यात काय तर व्यवसायाचे योग्य व्यवस्थापन करुन आपल्याला आपल्या जीवनाचे सार्थ मिळवता येते. जापनीज भाषेत सांगायचे तर 'इकिगाई' अर्थात 'अशी संकल्पना जी एखाद्याला उद्देशाची जाणीव देते, जगण्याचे कारण देते' ती आपल्याला व्यवसाय सांभाळूनही साध्य करता येते.

पण अशा स्वप्नांच्या सार्थकतेसाठी किंवा सक्सेसफुल विनिंगसाठी आवश्यक असते ती व्हिजन अर्थात ध्येय. म्हणजे आपल्याला कुठे जायचे आहे हे आपल्याला माहिती असावे लागते. इथे मला 'Alice in Wonderland' (1865 मध्ये प्रसिद्ध झालेली इंग्रजी कादंबरी) मधला एक छोटासा प्रसंग आठवतो. ॲलीस (कथेतील मुख्य पात्र) थकलेली असते. वेगवेगळ्या प्रसंगातून जाऊन एकदम आश्चर्यचकित झालेली असते. आणि अशा परिस्थितीत ती म्हणते 'Would you please tell me which way I opt to go from here?' ('कृपया तुम्ही मला सांगाल का कि इथून पुढे जाण्यासाठी मी कोणता मार्ग निवडावा?') तेव्हा मांजर (कथेतील पात्र) ॲलीसला म्हणते 'That depends a good deal on where you want to get to.' ('तुला कुठे जायचे आहे यावर बरेच काही अवलंबून आहे.') म्हणजेच काय तर तुम्हाला कुठे जायचे आहे ह्यावर तुम्ही कसे जायचे हे अवलंबून असते. अर्थात आपल्या बिझनेसचा जो काही प्लॅन आपण करणार असतो, आराखडा तयार करणार असतो, तो आपल्याला कुठे पोहोचायच आहे? याच्यावर अवलंबून असतो. म्हणूनच विनिंग जीवनासाठी आवश्यक असलेल्या सक्सेसफुल बिझनेससाठी आपल्याकडे व्हिजन असणे गरजेचे असते.

आता या व्हिजनमुळे काय होणार आहे? हे जाणून घेऊयात. व्हिजनमुळे फोकस तयार होतो. म्हणजे कोणत्या गोष्टी करायच्या आणि कोणत्या गोष्टी करायच्या नाहीत हे ठरवता येते. कोणत्या नव्या गोष्टी शिकायला हव्यात, कोणत्या नव्या क्षमता तयार करायला हव्यात हे व्हिजनमुळे कळत राहते. उदा. आपल्याला जर एक बिल्डिंग बांधायची असेल तर आधी बिल्डिंगचा प्लॅन बनवावा लागतो. आता प्लॅन जितका चांगला तेवढ्या कमी वेळेत (अनुषंगाने कमी खर्चात) बिल्डिंग पूर्ण होते. अच्छा यातील मजेशीर बाब अशी कि हे बिल्डिंग चे स्वप्न आपण दोन वेळेला जगत असतो. एक प्लॅनिंग करताना आणि दुसरे प्रत्यक्षात बिल्डिंग उभारताना. बिझनेसची व्हिजन आणि त्याचे प्लॅनिंग दोहोंमध्ये हेच अनुभवता येते. म्हणूनच व्हिजन साध्य करण्यासाठी बिझनेस प्लॅन खुप जास्त महत्वाचा असतो आणि तो तसा ठरतो देखील! व्हिजनमुळे महत्वाचा फायदा असा सुद्धा होतो की जे ठरवले आहे तिथे पोहोचायचे कसे? याचा छोटी छोटी ध्येये-उद्दिष्टे ठरवून एक प्लॅन तयार करता येतो. त्यामुळे उत्साही टीमला अधिकाधिक चांगले काम करण्यासाठी प्रवृत्त करता येते. व्हिजन गाठण्यासाठी किंवा साध्य करण्यासाठी एक फीडबॅक लूप तयार करता येतो. जसे व्हिजनला पोहोचण्यासाठी आपण योग्य मार्गावर आहोत का? त्यात काही सुधारणा करण्याची गरज आहे का? असे आपल्याला कळत राहू शकते. ज्यामुळे व्हिजन गाठणे अधिक सरल होते.

एकंदरीतच काय तर बिझनेसमध्ये आणि त्या मार्गे जीवनामध्ये विजयी बनायचे असेल तर आजच एक व्हिजन ठरवा. छोटी छोटी ध्येये-उद्दिष्टे ठरवून एक प्लॅन तयार करा. ठरवल्याप्रमाणे काम करायला सुरुवात करा आणि करत रहा. 'मंझिल कौनसी दूर है। पास ही तो है।' विजयम् भवतु!!